## सुटू ना ही दिली कधी सत्याची कास तू

## चाल - मन धागा धागा जोडतो नवा

सुटू ना ही दिली कधी सत्याची कास तू
मनामध्ये भरला आमुच्या ठाम हा विश्वास तू
स्नेहाच्या बरसुनी सरी या प्रेम दिले सर्वांस तू
प्रकाशित हे मार्ग केले समर्पित हा प्रवास तू
माऊली माऊली तु सविंदर माऊली
सत्य स्नेह समर्पणाची ममतामयी तू सावली माऊली माऊली (धृ)

सदगुरु हरदेवा संगे यात्रा करी कल्याण तू
सान थोर सर्वावरती प्रेम एकसमान तू
काटे सारे निवडुनिया फुलविली ही बाग तू
सुप्त भक्तीभावनेला आणलीस जाग तू
गुरुवचनाचे करूनी जागर सांभाळीले आम्हास तू
रात्रंदिन या मिशनचा विकास व्हावा ध्यास तू (१)

पुरविल्या सकलांच्या ईच्छा तुच हो वरदायिनी
केली ना देहाची पर्वा रथ हा अविरत नेवुनी
माता तु युगनिर्माता बनुनी दिली संजीवनी
क्रुपा केली सदगुरुरुपी सुदिकक्षा हया देवुनी
निराकार हा सहज जीवन आधार मानी तू
राजु वाही श्रध्दासुमने धन्य धन्य जननी तु (२)